॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २२ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व भारतीय सर्व्हेक्षण विभाग पुणे यांच्यात दि. २१ नोव्हेंबर रोजी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.

या करारावर पुणे येथील भारतीय सर्व्हेक्षण विभाग महाराष्ट्र आणि गोवा जी.डी. चे संचालक डॉ. ए.के.सिंग व विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. एस.एन. पाटील, प्रा. एस.आर.थोरात, प्रा.व्ही.एम. रोकडे वप्रा. के.पी. दांडगे उपस्थित होते.

या करारामुळे भूस्थानिक माहिती आणि तंत्रज्ञानाच्या महत्वाच्या तांत्रिक क्षेत्रात सहकार्य आणि परस्पर लाभांना प्रोत्साहन देण्याचे कार्य केले जाणार आहे. या करारा अंतर्गत दोन्ही संस्था एकत्रित काम करणार असून चर्चासत्रे, कार्यशाळा आणि इतर सामायिक कार्यक्रम घेतले जाणार आहेत. तसचे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आंतरवासिता (इंटर्नशिप) संधी उपलब्ध करून देणे तसेच शैक्षणिक संशोधन आणि भूस्थानिक विज्ञानाच्या प्रत्यक्ष उपयोजनातून दरी कमी करणे व राष्ट्रीय स्तरावरील मूलभुत डेटा व प्रगत मॅपिंग तंत्राशी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना थेट संपर्क साधण्याची संधी देखील मिळेल. या सामंजस्य करारामुळे भारत सरकारच्या राष्ट्रीय प्राथमिकतांशी शैक्षणिक संस्थांना जोडण्याच्या दिशेने हे एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २२ नोव्हेंबर, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २२ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात नवसंशोधन,नवोपक्रम व साहचर्य मंडळातर्फे (केसीआयआयएल) आयोजित तीन दिवसीय स्टार्टअप अंतर्गत विशेष कौशल्य शिबीराचा (स्टार्टअप बुटकॅम्प) आज दि. २२ नोव्हेंबर, २०२५ रोजी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप झाला.

यावेळी मंचावर जळगाव येथील स्पेक्ट्रम इलेक्ट्रीकल लि.चे चेअरमन व मुख्य कार्यकारी संचालक दीपक चौधरी कुलसचिव डॉ.विनोद पाटील, केसीआयआयएलचे संचालक प्रमोद संचेती, नवसंशोधन,नवोपक्रम व साहचर्य मंडळाचे, संचालक डॉ. राजेश जवळेकर, समन्वयक मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नवीन खंडारे उपस्थित होते.

प्रमुख अतिथी दीपक चौधरी यांनी सांगितले की, अथक परिश्रमातूनच यशस्वी उद्योजक होता येत. व्यवसायाचे नितीसूत्र प्रामाणिक पणे अवलंबल्यास यशस्वीतेकडे वाटचाल करता येते. असे सांगून त्यांनी त्यांच्या यशस्वी उद्योजकाचा प्रवास कथन केला. उद्योजक प्रमोद संचेती यांनी सांगितले की, उद्योग व्यवसायात विविध कल्पना साकारता येवू शकतात. इतरांपेक्षा वेगळ काम करून आपला ठसा उमटवावा. भारतात स्टार्टअप करीता पोषक वातावरण आहे.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांनी सांगितले की, आपल्या देशात स्टार्टअप करीता सरकारने तीन महत्वपूर्ण योजना सुरु केल्या आहेत. भारतातील तरूण हुशार व होतकरू असल्याने या स्टार्टअपमध्ये जगात भारत तीसऱ्या क्रमांकावर आहे. परंतु स्टार्टअपचे रूपांतरण यशस्वी उद्योगात झाले पाहिजे. त्याकरीता संयम, प्रामाणिकपणा आणि व्यवसायाची नितीसूत्र अंगीकारणे आवश्यक आहे. सुरुवातीस या तीन दिवसीय कार्यशाळेचा आढावा डॉ. नवीन खंडारे व डॉ. राजेश जवळेकर यांनी मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशनी जैन यांनी केले.

या शिबीरात दि. २१ नोव्हेंबर रोजी डॉ. नवीन खंडारे, डॉ. युवराज परदेशी, श्रीकांत पाटील, उल्हास भाळे, सीए पंकज दारा व अक्षर गव्हाने, सुनील देवधरे यांनी मार्गदर्शन केले. हे शिबीर दि. २० ते २२ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आले. यावेळी या शिबीराकरीता योगेश पाटील व विभागातील कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले. या शिबीरात कोल्हापूर, यवतमाळ, पुणे यासह विविध भागातून ३० नवउद्योजक सहभागी झाले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २२ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता